(२०)

१

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

सोमवार दिनांक २७ जून १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या २० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची २० वी बैठक दिनांक २७ जून १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वामन मटकर, | सभापती |
| २] | श्री. हेमराज शहा, | उपसभापती |
| ३] | श्री. अशोक लाल | मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. व्ही. बी. वरसकर | सदस्य |
| ५] | श्री. कमलाकर शर्मा | सदस्य |
| ६] | श्री. चेतन शहा | सदस्य |
| ७] | श्री. रॉकी कास्टो | सदस्य |
| ८] | श्री. विवेक भार्गु | सदस्य |
| ९] | श्री. फारुख मन्सुरी | सदस्य |
| १०] | श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ११] | श्री. मोहम्मद आझम खान | सदस्य. |
| १२] | श्री. पोतदार, प्रमुख अभियंता मुंबई महापालिका यांचे प्रतिनिधी. | |
| १३] | उपकर संचालक व संकलक, मुंबई महापालिका | निमंत्रित. |

मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला ह्यांनी आपण सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले. तसेच उपसचिव श्री. यादवराव कांबळे, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग ह्यांनी देखील कांही कारणास्तव सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले.

तदनंतर माननीय सभापती डॉ. शंकर वामन मटकर यांचे अध्यक्षते खाली सभेस प्रारंभ झाली. मा. सभापती, उपसभापती, सदस्य, निमंत्रित व अधिकारी यांचे स्वागत करण्यात आले.

[illegible] २०/१

...२/...

366

3



बाब क्रमांक :२०/१

विषय:- मंडळाच्या १९व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

दिनांक २४.५.१९९४ रोजी झालेल्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृ.क्र.१ ते १३ वर सादर केलेला आहे.

पृ.क्र.५ वरील पहिल्या परिच्छेदातील १३ व्या ओळीतील " ... नोंद घेण्यात आली नाही." ह्यास मा.उपसभापती श्री.हेमराज शहा ह्यांनी आक्षेप घेतला, " नोंद घेण्यात आलेली नाही" ह्याऐवजी "नोंद घेण्यात आली " अशी दुरूस्ती करण्याचे त्यांनी सुचविले. तदनुसार १३ व्या ओळीत " नोंद घेण्यात आली " अशी दुरूस्ती करून वरील कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक:२०/२ अनुपालन अहवाल.

विषय:- म्हाडा अधिनियमाच्या कलम ८८[३] "[अ] नुसार घोषित केलेल्या परंतु पुनर्बांधणी दु:साध्य असलेल्या इमारतींच्या दुरूस्तीकरिता दुरूस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा शिथिल करणे.

पृष्ठ क्रमांक १५ ते १७ वर ठेवण्यात आलेल्या विषयावर चर्चा होऊन वरील प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचारार्थ व मंजुरी करिता सादर करणेस मंडळाने सर्वानुमते मंजुरी दिली.

ठराव क्र. २०/१४०
=============

पूर्तता
उ.मु.अ. [पुनर्र]

विषयांकित प्रकरणांतर्गत बाब प्राधिकरणाच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....3/...

५.

: ३ :

बाब क्रमांक २०.३

विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या तांत्रिक समितीच्या दि. २४.५.९४ रोजी झालेल्या पाचव्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

पृ.क्र. १९ ते ४९ वर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. २४.५.९४ रोजी झालेल्या ५ व्या तांत्रिक समितीचा कार्यवृत्तांत सादर केलेला आहे.

पृ.क्र. ३१ वरील शेवटच्या परिच्छेदात "मा. उपसभापती श्री. हेमराज शहा यांनी दक्षिण परिमंडळ अंतर्गत "ब" विभाग, सी-३-४ विभाग व डी-१ विभागामध्ये नवीन दुरुस्तींची कामे हाती न घेण्याबद्दलचे मुख्य अधिकारी यांचे दि. १५.४.९४ रोजी परिपत्रक काढले आहे. सदर परिपत्रकास अनुसरून त्यांनी मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, सदर परिपत्रक रद्द करून संबंधित विभागातील दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्यात यावी. यावर मुख्य अधिकारी यांनी जरुरी दुरुस्ती कामे हाती घेण्यासंबंधी संमती दर्शविली" असे म्हटलेले आहे.

यावर चर्चा करताना मा. उपसभापती श्री. हेमराज शहा ह्यांनी दि. १५.४.९४ रोजीचे परिपत्रक मागे घेतल्याचे पत्र संबंधित अधिकाऱ्यांना पाठवावे असे सुचविले जेणेकरून संबंधित विभागातील दुरुस्तीची खोळंबून राहिलेल्या कामाच्या निविदा मागवून ती त्वरित सुरु करता येतील. यास मा. सभापती डॉ. शंकर मटकर ह्यांनी संमती दर्शविली. यावर मुख्याधिकारी श्री. अशोक लाल ह्यांनी दि. १५.४.९४ रोजीचे परिपत्रक मागे घेण्याबाबतचे पत्र उपमुख्य अभियंता [दक्षिण] ह्यांना त्वरित पाठविण्यात येईल असे सांगितले. (पूर्तता नि. का. अ.)

वरील प्रमाणे नोंद घेऊन पृ.क्र. १९ ते ४९ वर ठेवण्यात आलेला ५व्या तांत्रिक समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

...४/...

365



७

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी ह्यांनी असा मुद्दा मांडला की, तांत्रिक समितीने मंजूरी दिल्यानंतर प्रत्यक्ष दुरुस्ती कामास किती वेळात सुरुवात करण्यात येते?

त्यांनी असे प्रतिपादन केले की, मागील बैठकीत मा. सभापती डॉ. भटकर ह्यांनी देखील असे निदर्शनास आणून दिले होते की, तांत्रिक समितीने मंजूरी दिल्यानंतर व निविदा मागविल्यानंतर इमारत धोकादायक स्थितीत असलीतरी देखील ठेकेदार सहा-सहा महिने पर्यंत काम सुरु करत नाही, तर अशा वेळेस मंडळाच्या अधिका-यामार्फत कोणती कारवाई केली जाते, यावर श्री. हडदरे उपमुख्य अभियंता [दक्षिण] ह्यांनी असा खुलासा केला की, नियोजित वेळेत जर कामास सुरुवात केली नाही तर, कंत्राटदारास शिक्षा म्हणून दंड आकारण्यात येतो व तेही करुन जर काम सुरु केले नाही तर दुसरा ठेकेदार नेमण्यात येतो. यावर मा. सभापतींनी विचारले की, कंत्राटदारास किती व कशाप्रकारे दंड आकारला जातो, श्री. हडदरे यांनी खुलासा केला की याबाबतीत निश्चित असा नियम लागू नाही. या विषयावर पुढे बोलताना मा. सभापतींनी प्रतिपादन केले की, मंडळाकडे पंजीकृत असणा-या कंत्राटदारांची संख्या व दोन्ही परिमंडळातील दुरुस्ती कामांच्या संख्येचे प्रमाण हे जवळ-जवळ समप्रमाणात असूनदेखील निविदा मागवून झाल्यानंतर बराच काळ कामे खोळंबून का राहतात? उदाहरणादाखल त्यांनी कटारिया मार्गावरील "दामोदर निवास" ह्या इमारतीच्या दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तांत्रिक समितीने मार्च ९४ च्या सभेत मंजूरी देऊन सुध्दा अद्यापि काम सुरु केलेले नाही असे सभागृहात सांगितले. यावर उपमुख्य अभियंता [उत्तर] श्री. कुराणी ह्यांनी ह्या कामाकरिता अद्यापि कंत्राटदाराची अंतिम नेमणूक केलेली नसल्याचे सांगितले. याबाबत मा. उपसभापती श्री. हेमराज शहा ह्यांनी अशा ब-याच कामाची सुरुवात जी तांत्रिक समितीने मंजूरी देऊन सुध्दा केलेली नसल्याचे सभागृहात सांगितले, तसेच निविदा मागवून कंत्राटदाराची नेमणूक झाल्यानंतर त्याने अमूक वेळात काम सुरु केलेच पाहिजे याबाबत अटी व शर्ती घालता येतील किंवा नाही अशी विचारणा केली.

बाब क्र. २०.४

विषय:- इ.क्र. १-३ रंगारी चाळ, पदी फॉकलंड छेदगल्ली "ड" विभाग या कामाच्या मे. चौहान ब्रदर्स ह्या ठेकेदाराच्या स्वीकृत निविदांना मंजूरी देण्याबाबत.

.......

पृ.क्र. ५१ ते ५७ वर सदस्य सचिव निविदा समिती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] ह्यांनी इ.क्र. १-३ रंगारी चाळ छेदगल्ली, "ड" विभाग ह्या इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या ठेकेदार मे. चौहान ब्रदर्स ह्यांनी भरलेल्या प्रथम निम्नतम निविदा स्वीकृतीस निविदा समितीने केलेल्या शिफारशीनुसार मंडळाच्या कार्योत्तर मंजूरीस्तव सादर केलेली आहे.

यावर साधकबाधक चर्चा होऊन मंडळाने मे. चौहान ब्रदर्स ह्यांच्या निविदा समितीने स्वीकृत केलेल्या प्रथम निम्नतम निविदेस मान्यता दिली. पुढे मा. सदस्य श्री. भर्तू यांनी विचारले की, मंडळाच्या ताब्यात असलेल्या मोकळ्या भूखंडावर अतिक्रमण झाले असता त्यावर काय कार्यवाही केली जाते. त्यास उत्तर देताना उपमुख्य अभियंता [पुनर्] श्री. मर्चंट ह्यांनी असे सांगितले की, त्यावर कायदेशीर कारवाई करुन अतिक्रमण हटविले जाते. तसेच यापुढे अशी अतिक्रमणे होऊ नयेत म्हणून विशेष "वॉच ॲन्ड वार्ड" नेमण्याकरिता त्यांनी मुख्य अधिकारी/ दुवपु मंडळ ह्यांच्याकडे परवानगी मागितलेली आहे.

ठराव क्र. २०/१४१.

इ.क्र. १-३ रंगारी चाळ, "ड" विभाग ह्या इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या ठेकेदार मे. चौहान ब्रदर्स ह्यांच्या निविदा समितीने स्वीकृत केलेल्या प्रथम निम्नतम निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक २०:५

विषय :- अरुंद भूखंड, रस्ता रुंदीकरण व विकास आराखडयातील आरक्षणामुळे दु:साध्य असलेल्या पुनर्बांधणी योजनांबाबत....

........

वरील विषयाबाबतची सविस्तर बाब टिप्पणी पृ.क्र. ५९ ते ६९ वर सादर केलेली आहे.

सदर विषयावर चर्चा करण्यापूर्वी मा. उपसभापती श्री. हेमराज शहा यांनी सांगितले की, सदर बाबीचा सखोल अभ्यास करावयाचा असल्यामुळे सदरची बाब टिप्पणी पुढील बैठकीत सविस्तर चर्चेसाठी ठेवावी. यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, श्री. मर्चंट साहेब ३० जूनला सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या टिप्पणीबद्दल त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, यावर मुख्य अधिकारी/दु. व पु. यांनी सांगितले की, श्री. मर्चंट साहेबांचा पुनर्बांधणी विभागातील अभ्यास लक्षात घेता ते सेवानिवृत्त झाल्यावर त्यांना तांत्रिक सल्लागार म्हणून नेमण्यासाठी प्राधिकरणास विनंती केलेली आहे. यावर मा. सभापती श्री. मटकर साहेब यांनी मुख्य अधिकारी/दु. व पु. च्या प्रस्तावास दुजोरा दिला.

वरील विषयांबाबतची सविस्तर माहिती श्री. मर्चंट, उपमुख्य अभियंता [पुनर्र] इयांनी सभागृहास दिली. त्यांनी सांगितले की, प्रत्यक्ष केलेल्या सर्वेक्षणानुसार २२२ इमारतींची पुनर्बांधणी योजना अशक्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्या. त्यापैकी १०२ इमारतींची पुनर्बांधणी योजना विशेष सवलती प्राप्त करून मंडळ करू शकते. परंतु १२० इमारती अशा आहेत की, ज्यांची पुनर्बांधणी अजिबात शक्य होणार नाही.

यावर सभागृहात मा. सभापती, मा. उपसभापती, मुख्य अधिकारी, सदस्य श्री. चेतन शहा, श्री. भर्तू व मंडळाचे व महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रदीर्घ अशी चर्चा केली.

चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, श्री. मर्चंट, उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] इयांनी २२२ इमारतींची सविस्तर माहिती तिच्या प्लॉटची मोजमापे, भाडेकरू, सद्य:स्थिती इ. सह सादर करावी व प्रत्येक इमारतीचा तिच्या गुणवत्तेनुसार अभ्यास करण्यासाठी खालील सदस्यांची उपसमिती नेमण्याचे ठरले.

१] मा. सभापती, २] उपसभापती, ३] मुख्य अधिकारी, ४] सदस्य, श्री. भर्तू, ५] श्री. चेतन शहा व त्यांनी सदर बाबतची सविस्तर माहिती येत्या दोन ते तीन महिन्यात सभागृहासमोर सादर करावी असे ठरले. यापुढे चर्चा करतांना मा. सदस्य श्री. चेतन शहा इयांनी असा मुद्दा मांडला की, पुनर्बांधणी योजनेतून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त गाळ्यांची विक्री करण्यास न्यायालयाचा जो मनाई हुकूम आहे त्यावर फेरविचार होणे आवश्यक आहे.

जरूर पडल्यास न्यायालयात

पूर्तता
स.मु.अ./दु.
व पु.

यासंबंधी पुन्हा याचिका दाखल करण्यास हरकत नसावी असे मत त्यांनी मांडले जेणे करुन काही निश्चित स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना पुनर्बांधणी योजनेस मिळवाव्यात व सदर बाबत मुख्य अधिकारी/दु. व पु. यांनी संमती दर्शविली.

बाब क्र. २०/६
=============

विषय :- जुन्या जागेचे क्षेत्रफळ कमी/जास्त असल्यास त्यास जास्तीत जास्त क्षेत्रफळ देण्यात यावे/येऊ नये याबाबत...

.........

विषयांकित प्रकरणाची बाब टिप्पणी पृ.क्र.७१ ते ७३ वर सादर केलेली आहे.

या विषयावर सुरुवातीस चर्चा करताना मा. सदस्य श्री. चेतन शहा ह्यांनी बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेले क्षेत्रफळ हे कारपेट आहे की बिल्ट अप आहे? असा प्रश्न उपस्थित केला. यावर सहमुख्य अधिकारी/ दुवपु मंडळ श्री. जग्यासी ह्यांनी हे क्षेत्रफळ कारपेट [चटईक्षेत्रफळ] असल्याचा खुलासा केला.

तद्नंतर वरील विषयावर प्रदीर्घ चर्चा होऊन, मा. सभापती डॉ. मटकर ह्यांनी अधिकच्या क्षेत्रफळास बाजारभावाप्रमाणे अधिमूल्य आकारल्यास तो एक प्रकारचा अन्याय भाडेकरू/रहिवाश्यावर होईल असे प्रतिपादन केले, कारण सध्या मुंबई शहराच्या विविध भागात वेगवेगळा बाजारभाव आकारला जातो. वास्तव त्यांनी अधिकचे क्षेत्रफळ देताना खालील टप्प्याटप्प्याने अधिमूल्याचा दर वाढविण्यात यावा असा प्रस्ताव मांडला.

...८/...

| वाढीव क्षेत्रफळाचा टप्पा. [चटई क्षेत्र ] | दर प्रति चौ. फू. |
|---|---|
| १] २०१ चौ. फू. ते २५० चौ. फू. | रु. ५००/- |
| २] २५१ -"- ते ३०० -"- | रु. ७५०/- |
| ३] ३०१ -"- ते ३६० -"- | रु. १००/- |

वरील प्रस्तावित दर हा निवासी गाळ्याकरिता लागू असेल, अनिवासी गाळ्याचे अधिमूल्य ठरविताना निवासी गाळ्याच्या अधिमूल्याच्या तीन पट करुन अधिमूल्य काढण्यात यावे असे ठरले.

वरील प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

या अगोदर मा. सदस्य श्री. भर्तू ह्यांनी पुनर्रचित इमारतीत कमीत कमी १८० चौ. फू. चे गाळे देणे मंडळावर बंधनकारक आहे का? अशी विचारणा केली, त्यावर उपमुख्य अभियन्ता [पुनर्रचना] ह्यांनी शासनाच्या धोरणानुसार पुनर्रचित गाळे हे कमीत कमी १८० चौ. फू. चटईक्षेत्र असलेले व संडास, न्हाणी आंत असलेले म्हणजेच स्वयंपूर्ण गाळे बांधणे आवश्यक असल्याचे सांगितले.

ठराव क्र. २०/१४२
==============

निवासी गाळ्याकरिता अधिकचे क्षेत्रफळ देताना खालीलप्रमाणे अधिमूल्य आकारण्यांत यावे असा ठराव एकमताने मंजूर करण्यांत आला.

| वाढीव क्षेत्रफळ टप्पा. [चटई क्षेत्रफळ चौ. फू. ] | दर प्रति चौ. फू. |
|---|---|
| २०१ ते २५० | रु. ५००/- |
| २५१ ते ३०० | रु. ७५०/- |
| ३०१ ते ३६० | रु. १०००/- |

टिप :- वर ठरविलेल्यादराच्या तिप्पटीने अनिवासी गाळ्याकरिता अधिमूल्य आकारण्यांत यावे असे ठरले.

बाब क्रमांक :२०/७

विषय:- इमारत क्रमांक:१७-१९-२१ मलबारी हाऊस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्ही. व्ही. चंदन स्ट्रीट "बी" विभाग मस्जिद बंदर, मुंबई-३ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित मलबार हाऊस सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

विषयांकित प्रकरणाची बाब टिप्पणी पृ. क्र. ७५ ते ९३ वर सादर करण्यात आलेली आहे.

सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

ठराव क्र. २०/१४३

इ. क्र. १७-१९-२१ मलबारी हाऊस, व्ही. व्ही. चंदन स्ट्रीट, "बी" विभाग मस्जिद बंदर, मुंबई -३ येथील इमारतीसह भूखंड रहिवाश्यांच्या नियोजित मलबार हाऊस सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

बाब क्रमांक:२०/८ अध्यक्षांच्या परवानगीने घ्यावयाचे आयत्यावेळचे विषय.

विषय:- पुनर्रचित होणाऱ्या परंतु कमी गाळे होणाऱ्या इमारतीतील रहिवाश्यांना इतर पुनर्रचित इमारतीत गाळे देण्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी मा. सभापती डॉ. मटकर ह्यांच्या परवानगीने आयत्या वेळची बाब म्हणून पृ. क्र. ९५ ते ९७ वर सादर केलेली आहे.

उपरोक्त विषयांतर्गत असे प्रस्तावित केले आहे की, ज्या पुनर्बांधणी योजनामध्ये कमी गाळे उपलब्ध होतात, त्यापैकी ज्यांना नियोजित नवीन इमारतीत सामावून घेतले जाणार नाही, अशा संक्रमण शिबिरात राहणाऱ्या गाळेधारकांची नावे सदर डेफिसिट [कमी उपलब्ध होणारे गाळे] योजनेचे महापालिकेने नकाशे मंजूर केल्यानंतर लगेचच बृहत्सूचीवर घेऊन ज्येष्ठतेनुसार त्यांना इतरत्र पुनर्रचित इमारतीत गाळे वितरण करावे.

...१०/..

वरील विषयावर प्रदीर्घ चर्चा झाली. मा. सदस्य श्री. चेतन शहा ह्यांनी असे सुचविले की, वरील प्रकारची कार्यवाही ही महापालिकेने नकाशे मंजूर केल्यानंतर करण्याऐवजी प्रत्यक्ष जेव्हा कामास सुरुवात होईल त्यावेळेस करावी, जेणेकरून जे गाळेधारक त्यांच्याच मूळ इमारतीत परतणार आहेत, त्यांच्या मनात पक्की खात्री होईल परंतु याबाबत मुख्य अधिकारी/ दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ ह्यांनी असे सांगितले की, एकदा का महापालिकेने नकाशे मंजूर केले की, डेफिसिट पुनर्रचित योजनेत होणा-या गाळ्यांची संख्या निश्चित होते. त्यामुळे जे अयशस्वी गाळेधारक कमी उपलब्ध होणा-या गाळ्यांमुळे संक्रमण शिबिरात आहेत, त्यांचा समावेश ते ज्या दिवसापासून संक्रमण शिबिरात रहात आहेत, त्या दिवसापासून बृहत्सूचीत करण्यात यावा. यावर मा. सदस्य श्री. चेतन शहा ह्यांनी अशा वेळेस जर बृहत्सूचीवरील गाळेधारकास प्रथम पुनर्रचित गाळा मिळाल्यास मूळ इमारतीत परतणारा गाळेधारक न्यायालयांत जाण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. तेव्हा मुख्य अधिका-यांनी असे सांगितले की, सध्या फक्त एक दोन प्रकरणांत अशा प्रकारचे धोरण अवलंबून त्याचा काय परिणाम होईल, हे अजमावून पाहिले जाईल व म्हणून उपमुख्य अभियंता [पुनर्र] ह्यांच्या वरील बाब टिप्पणीस मंजूरी द्यावी.

सरतेशेवटी वरील प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक: २०/१४४

पुनर्रचित होणा-या परंतु कमी गाळे होणा-या [डेफिसिट] इमारतींतील गाळेधारक नवीन इमारतीत जागा मिळण्यास सोडतीनुसार अयशस्वी ठरतील, त्यांची नावे अशा इमारतींच्या पुनर्बांधणीचे नकाशे महापालिकेने मंजूर केल्यानंतर ते ज्या दिवसापासून संक्रमण शिबिरांत असतील त्या दिवसापासून बृहत्सूचीवर घेऊन त्यांना इतरत्र पुनर्रचित इमारतींत सामावून घेण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

चर्चेच्या ओघाओघाने मा. सदस्य श्री. चेतन शहा ह्यांनी मा. सभापती डॉ. मटकर जे प्राधिकरणाचे देखील सदस्य आहेत, त्यांना विचारणा केली की, मागील प्राधिकरणाच्या बैठकीत खाजगी सहकारी गृहनिर्माण संस्थांना मंडळाच्या ताब्यांत असलेल्या जागेवर ३. १९२

चटईक्षेत्र निर्देशांक देऊन त्यापैकी २.०० चटईक्षेत्र त्यांच्यासाठी म्हणजेच जुन्या भाडेकरूंना पुनर्वसित करून राहिलेले क्षेत्रफळ बाजारभावाने विकण्याची मुभा देऊन व उर्वरित १.१९२ चटईक्षेत्रान्वये मंडळास सुपूर्द करावयाच्या बाब टिप्पणीवर काय निर्णय घेण्यात आला. त्यावर मा. सभापतींनी प्राधिकरणाच्या बैठकीपुढे अद्यापि अशाप्रकारची बाब टिप्पणी सादर केली नसल्याचे सांगितले. याबाबत मुख्य अधिकारी ह्यांनी नुकतीच नागरी विकास खात्यातील अधिकाऱ्यांनी जर सहकारी गृहनिर्माण संस्थांमार्फत पुनर्विकास करावयाचे झाल्यास त्यांना केवळ २.०० किंवा पूर्वी वापरण्यात आलेला चटईक्षेत्र यापैकी जो अधिकचा असेल असा चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत मिळेल असे सांगितले व ३.१९२ चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत फक्त मंडळ किंवा महापालिकेसच मिळेल असे स्पष्ट केले.

सभेचा समारोप करण्यापूर्वी मा. सभापती डॉ. मटकर ह्यांनी सभागृहास माहिती दिली की, उपमुख्य अभियंता [पुनर्र] श्री. मर्चंट हे प्राधिकरणातील ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३० जून १९९४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. श्री. मर्चंट ह्यांनी प्राधिकरणाच्या विविध विभाग/मंडळांवर विशेषतः पुनर्बांधणी विभागातील केलेल्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल मा. सभापतींनी गौरवोद्गार काढले व त्यांची उणीव मंडळास कायमची राहिल, असे सांगून त्यांना त्यांचे पुढील आयुष्य सुखासमाधानाचे व निरोगी कंठित करता येवो याबद्दल उपस्थित सर्व मान्यवरांतर्फे श्रीचरणी प्रार्थना केली.

श्री. मर्चंट ह्यांनी केलेल्या आपल्या छोटेखानी भाषणात प्रथमतः सर्वांचे आभार मानले व आतापर्यंत त्यांनी प्राधिकरणात केलेल्या सेवेबद्दल संक्षिप्त माहिती दिली. त्यांनी सांगितले की, त्यांनी काम केलेल्या विभागांपैकी पुनर्बांधणी विभागातील काम हे त्यांना अधिक आव्हानात्मक वाटले. जुन्या इमारतीतील गाळेधारकांना संक्रमण शिबिरात हलवून त्यांची इमारत पुनर्रचित करून पुन्हा त्यांचे पुनर्रचित इमारतीत पुनर्वसन करणे, ही बाब फारच समाधानकारक आहे. कारण एखादी जुनी इमारत पुनर्रचित करतांना अनेक समस्या व अडीअडचणींवर मात करून काम करावे लागते. कारण अशा फारशा अडीअडचणींना गृहनिर्माण किंवा इतर विभागास सामोरे जावे लागत नाही. तसेच त्यांनी त्यांच्या

कृ. पु. प. १२.

३२ वर्षातील मंडळाच्या सेवेतील केलेल्या कामाची थोडक्यात माहिती सभागृहास देवून त्यांनी सर्वांचे आभार मानले.

पुन्हा एकदा श्री. मर्चंट ह्यांना सर्व सदस्य व उपस्थितांतर्फे त्यांच्या पुढील आयुष्यास शुभेच्छा व्यक्त करून मा. सभापतींनी तांत्रिक समिती-ची आगामी बैठक मंगळवार दि. ५ जुलै १९९४ रोजी व मंडळाची पुढील बैठक बुधवारी दिनांक २७ जुलै रोजी आयोजित करण्याचे घोषित केले.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य व सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सही/-
सचिव/मुंझ्दुवपुमं.

सही/-
मुख्य अधिकारी/मुंझ्दुवपुमं.

सही/-
सभापती/मुंझ्दुवपुमं.